# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 488/2022 दिनांक : 19.12.2022**

## हिमायमनगर पोलीसांनी मो सा चोरांना केले गजाआड, सहा मोटार सायकली किंमती चारलाख नऊ हजार रूपयाचा माल केला हस्तगत....

सध्या विवीध पोस्टे अंतर्गत मो सा चोरीच्या गुन्हयात वाढ होत असल्याने **मा. श्रीकृष्ण कोकाट,** पोलीस अधिक्षक नांदेड यांनी मासीक बैठकीत सदर गुन्हयास आळा घालण्याच्या सुचना केल्या होत्या. त्या अनुषंगाने पोस्टे हिमायतनगर येथील **श्री बि डी भुसनूर**, पोलीस निरीक्षक यांचे आदेशान्वये पोहेकॉ/सिंगनवाड, पोटे, पोना/शाम नागरगोजे, आऊलवाड, पोकॉ/जिंकलवाड असे पोस्टे हिमायतनगर गुरन 286/2022 कलम 379 भादविचा समांतर तपास करीत असतांना सदर गुन्हयाचा तपास मध्ये आरोपीचा शोध घेवुन सहा मोटर सायकली स्पलेंडर प्लस दोन, युनीकॉर्न दोन, शाईन एक, बुलेट अशा सहा मोटार सायकली एकुण चार लाख रूपयाचा मुद्येमाल एक विधीसंघर्ष बालक यांने त्याचा साथीदार शेख अबुजर शेख मुसा, वय 19 वर्षे, रा. हिमायतनगर यांच्या मदतीने चोरी केल्याचे कबुल केले आहे. सदर मो सा मालटेकडी, राजकॉर्नर, देगलुर नाका येथुन चोरलेल्या आहेत. विधीसंघर्ष बालक यास नोटीस देवुन त्याचे भावाचे ताब्यात दिले असुन दुसरा आरोपी शखे अबुजर यास अटक करून चार दिवसाची पोलीस कस्टडी घेवुन. त्यांचे ताब्यातुन सदर मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. आरोपी सध्या मॅजीस्ट्रेट कस्टडी रिमांडमध्ये आहे. दुसरा गुन्हा पोस्टे हिमायतनगर गुरन 274/2022 कलम 379 भादवि मधील आरोपी नामे गोपाळ शामराव वटाणे, वय 27 वर्षे, रा. कोपरा ता. उमरखेड जि. परभणी यांचे ताब्यातुन फुल ऑन कंपणीची बॅटरी किंमती 9,000/—रूपयाची हस्तगत केली आहे.

सदरची कार्यवाही **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री डॉ. खंडेराव धरणे**, अपर पोलीस अधीक्षक, भोकर, **मा. श्रीमती शफकत आमना**, सहा पोलीस अधिक्षक उपविभाग भोकर, **मा. श्री. बि. डी. भुसनूर** यांचे मार्गदर्शनाखाली पोहेकॉ/सिंगनवाड, पोटे, पोना/शाम नागरगोजे, आऊलवाड, पोकॉ/जिंकलवाड यांनी पार पाडली असुन वरिष्ठांनी त्यांचे अभिनंद केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


पोलीस
हिमायतनगर
.०२४६८-२४४०३३.
ता. हिमायतनगर. जि. नांदेड.


full-on
AUTOMOTIVE BATTERIES
24